महाराष्ट्र शासन

बैठकीची सूचना
बुधवार, दि. ०३.०२.२०१६
सायंकाळी०४.३० वा.

क्रमांक : बैठक-२०१६/प्र.क्र.१०/विजाभज-१
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
दिनांक : २१ जानेवारी,२०१६

प्रति,
श्री हरिभाऊ राठोड,वि. प. स
ए-२०१, बंजारा हिल,
बाबासाहेब नाईक सोसायटी,
अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ,
मुलुंड ( वेस्ट) मुंबई ८०

**विषय : भटक्या विमुक्त समाजाला क्रिमिलेअर संज्ञेमधून वगळण्या संदर्भातबैठक बोलविण्याबाबत.**
**बैठक-दि. ०३.०२.२०१६, सायंकाळी ४.३० वा.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, भटक्या विमुक्त समाजाला क्रिमिलेअर संज्ञेमधून वगळण्या संदर्भात बुधवार **दि. ०३.०२.२०१६, सायंकाळी** ४.३० वा. मा.प्रधान सचिव ( सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे मंत्रालयातील दालन क्र. १३७ ( विस्तार ) १ ला मजला, विस्तार इमारत , मंत्रालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे. संबंधित मुद्यांबाबत आपण सदर बैठकीस उपस्थित राहावे.

(दि.रा.डिंगळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत बैठकीस उपस्थित राहण्याच्या विनंतीसह सादर :
१) मा.प्रधान सचिव, सा.न्या.व वि.स. यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२
२) उप सचिव /अवर सचिव (विजाभज-१) सा.न्या व वि.स. विभाग मंत्रालय,
३) निवडनस्ती (विजाभज -१ ).

सदस्य
विधान परिषद

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

सत्यमेव जयते

प्रसिद्धी पत्रक

# भटक्या विमुक्तांना क्रीमिलीयर सज्ञेमधून वगळण्याबाबत बैठक

भटक्या विमुक्तांना क्रीमिलीयर सज्ञेमधून वगळण्याबाबत सतत पाठपुरावा करून हा प्रश्न्न विविध मार्गांनी व अर्थसंकल्प अधिवेशन २०१५, पावसाळी २०१५, व हिवाळी नागपूर २०१५ या अधिवेशनात हा मुद्दा मांडून राज्य शासन भटक्या विमुक्तांना क्रीमिलीयर सज्ञेमधून कधी वगळणार हा प्रश्न्न पोटतिडकीने मांडणारे विधानपरिषद आमदार हरिभाऊ राठोड यांनी सांगितले कि आपण केलेल्या प्रयत्नांना यश येयील अशी परिस्थिती निर्माण झाली असून लवकरच भटक्या विमुक्तांना क्रीमिलीयर सज्ञेमधून मधून वगळण्यात येईल. याला फक्त मंत्रिमंडळाची मान्यता घेणे बाकी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले .

येत्या ३ फेब्रुवारी २०१६ रोजो सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव यांच्या समवेत या बाबतीत अंतिम बैठक असून नागपूर अधिवेशनात दिलेल्या आश्वासन नुसार भटक्या विमुक्तांना क्रीमिलीयर सज्ञेमधून वगळण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या समोर सादर करण्याची कार्यवाही सुरु असून लवकरच भटक्या विमुक्तांना क्रीमिलीयर सज्ञेमधून वगळण्यात येयील अशे लेखी आश्वासन मा.मंत्री ना.राजकुमार बडोले यांनी दिले होते.

भटक्या विमुक्त समाज आणि बारा बलुतेदार अशा परंपरागत व्यवसाय करणाऱ्या लोकांना क्रीमिलीयर लागू होत नसतांनाही सरकारने मात्र या लोकांवर अन्याय चालू ठेवला आहे एकीकडे कायदेशीर रित्या क्रीमिलीयर या सज्ञे मध्ये हे लोक येत नसतानाहि आणि राष्ट्रीय मागासवर्ग आयोगांनी क्रीमिलीअरची उत्पन्नाची मर्यादा रु १० लाख असावी अशी शिफासार केली असतांनाही शासन मात्र मागासवर्गीय घटकांवर अन्याय करीत आहे विधानपरिषद आमदार हरिभाऊ राठोड यांनी या संबधीचा प्रश्न्न विधिमंडळाच्या विविध आयुधामार्फत उपस्थित करून व कायदेशीर रित्या शासनास समजावून सागीतल्या प्रमाणे हि मागणी शासनास मान्य करावी लागली आता मंत्रिमंडळ कधी निर्णय घेणार याकडे आमचे लक्ष राहणार आहे .

संपादक/प्रतिनिधी
वरील वृत्त आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्धीस द्यावी हि विनंती

आपला

हरिभाऊ राठोड
आमदार विधानपरिषद

E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वेस्ट), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, दारव्हा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 240570